# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. ०८ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## अहमदाबाद बॉम्बस्फोट : 38 दोषींची फाशी, 11 जणांची जन्मठेप कायम

**नवी दिल्ली :** २००८ मधील अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात गुजरात उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत विशेष न्यायालयाने २०२२ मध्ये सुनावलेली शिक्षा कायम ठेवली आहे. न्यायालयाने ३८ दोषींना सुनावलेली फाशीची शिक्षा आणि ११ दोषींची जन्मठेप कायम ठेवत दोषींच्या सर्व अपील याचिका फेटाळून लावल्या. या प्रकरणाची सुनावणी विशेष खंडपीठासमोर झाली. मार्च २०२५ पासून नियमित सुनावणीनंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. अखेर आज निकाल जाहीर करत विशेष न्यायालयाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.


### पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### 'हॉटेल न्यू अभिजीत काळे बंधू'चा परवाना निलंबित!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील जालना रोडवरील प्रसिद्ध 'हॉटेल न्यू अभिजीत काळे बंधू' अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) कारवाईमुळे मोठ्या अडचणीत आले आहे. अन्न सुरक्षा मानकांचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी प्रशासनाने या हॉटेलचा अन्न व्यवसाय परवाना तात्काळ निलंबित केला आहे.अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने या हॉटेलला अचानक भेट देऊन पाहणी केली. या तपासणीदरम्यान हॉटेलचे स्वयंपाकघर आणि साठवणूक विभाग कमालीचा अस्वच्छ आणि घाणेरड्या अवस्थेत असल्याचे आढळून आले. अन्न सुरक्षा मानकांच्या परिशिष्ट-४ मधील नियमांचे येथे सर्रास उल्लंघन होत असल्याचे उघड झाले. ग्राहकांच्या आरोग्याला थेट धोका निर्माण होऊ शकत असल्यामुळे प्रशासनाने कोणतीही कसर न सोडता थेट परवाना निलंबनाची कारवाई केली. राज्यात सध्या प्रशासनातर्फे 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' ही विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गतच ही धडक कारवाई करण्यात आली असून, हॉटेल चालकांमध्ये यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. "ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणत्याही अन्न आस्थापनेची किंवा हॉटेलची गय केली जाणार नाही," असा कडक इशारा अन्न व औषध प्रशासनाने या कारवाईनंतर दिला आहे. तसेच सर्व हॉटेल चालकांनी अन्न सुरक्षेचे आणि स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### 26 जुलैची 'सेट' परीक्षा पुढे ढकलली; 6 सप्टेंबरला होण्याची शक्यता

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील सहाय्यक प्राध्यापक पदाच्या पात्रतेसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ४१ वी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (SET) पुढे ढकलण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट परीक्षा विभागाने आज, ७ जुलै रोजी अधिकृत जाहीर प्रकटन प्रसिद्ध करून यासंदर्भातील माहिती दिली आहे. २६ जुलै २०२६ रोजीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (MPSC) सरळसेवा भरतीसाठी विविध विषयांच्या परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. दोन्ही महत्त्वाच्या परीक्षा एकाच दिवशी आल्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही एकाच परीक्षेला मुकावे लागणार होते, ज्यामुळे त्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले असते. ७ जुलै ते २५ जुलै २०२६ या काळात आषाढी वारीचे आयोजन करण्यात आले आहे. २६ जुलै रोजी परीक्षा घेतल्यास वारीमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी व गैरसोय होऊन, विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर वेळेत पोहोचणे अत्यंत कठीण झाले असते. या दोन्ही बाबींचा विचार करून विद्यार्थ्यांनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती. विद्यार्थ्यांचे हित आणि मागणी लक्षात घेऊन प्रशासनाने हा मोठा निर्णय घेतला आहे.या नवीन संभाव्य तारखेबाबत काही शैक्षणिक अडचणी किंवा इतर काही तांत्रिक समस्या उद्भवतात का, याची पूर्ण पडताळणी प्रशासनाकडून केली जाईल. त्यानुसार, पुढील १५ दिवसांत अंतिम तारीख आणि सविस्तर वेळापत्रक अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती सेट परीक्षेच्या समन्वयक यांच्या वतीने देण्यात आली आहे.

**संभाव्य तारीख:** ६ सप्टेंबर २०२६ परीक्षा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोणताही विद्यार्थी या परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी आता ही परीक्षा ६ सप्टेंबर २०२६ रोजी घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

### "शाल जोडे"




# पडद्यामागे खूप काही घडतंय... शरद पवार नवी खेळी खेळण्याच्या तयारीत?

**मुंबई :** महाराष्ट्राचे राजकारण सध्या इतक्या वेगाने बदलत आहे की, कालपर्यंत एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले नेते आज एकाच मंचावर किंवा गुप्त बैठकांमध्ये एकत्र दिसू लागले आहेत. काही दिवसांपूर्वीच उद्धव टाकरेंच्या शिवसेनेतील (उद्धव बाळासाहेब ठाकरे) 6 खासदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाल्याच्या 'ऑपरेशन टायगर'ने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली होती.

राजकीय पटलावरील हा खेळ शांतही झालेली नाही, तोच आता राज्याच्या राजकारणाला आणखी एक कलाटणी देणारी धक्कादायक माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष थेट सत्ताधारी महायुतीत सामील होणार का? या चर्चेने आता जोर धरला आहे. मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये झालेली एक गुप्त बैठक या सर्व चर्चांच्या केंद्रस्थानी आहे.

**'ती' भेट अन् राजकीय तर्कवितर्क :** शुक्रवारी एक अत्यंत महत्त्वाची आणि गुप्त बैठक पार पडली. ही बैठक दुसरी तिसरी कोणामध्ये नाही, तर शरद पवार गटाचे खंबीर नेतृत्व आणि माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात झाली.




### अशा भेटी होतच असतात - सुप्रिया सुळे

**या संभाव्य राजकीय भूकंपावर शरद पवार गटातील प्रमुख नेत्यांनी आपली बाजू मांडली आहे. खासदार सुप्रिया सुळे (Supriya Sule) यांनी जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्यातील विशिष्ट बैठकीबद्दल आपल्याला माहिती नसल्याचे सांगितले. तसेच त्यांनी अशा भेटी होतंच असतात असे म्हणत राजकीय चर्चांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.**

### थेट पाठिंबा की बाहेरून मदत?

**जर शरद पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा किंवा महायुतीला सहकार्य करण्याचा निर्णय घेतला, तर एनडीए आघाडीला नेमकी कशी मदत करायची, याबाबत सध्या दोन प्रमुख सूत्रांवर विचार सुरू असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.**

**पहिला पर्याय (थेट सहभाग): एनडीए आघाडीत अधिकृतपणे सामील होऊन सरकारमध्ये थेट भागीदारी करणे आणि मंत्रिपदे स्वीकारणे.**

**दुसरा पर्याय (बाह्य पाठिंबा): सरकारमध्ये थेट सामील न होता किंवा सत्तेत न बसता, बाहेरून सरकारला अनुकूल भूमिका घेणे किंवा वेळप्रसंगी सभागृहात मदत करणे.**

**या दोन पर्यायांवर सध्या चाचपणी सुरू असून, शरद पवार शेवटी कोणता पत्ता टाकतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## विधान परिषदेत पडेगाव कचरा प्रकल्पाचा मुद्दा गाजला

### क्षमतेपेक्षा अधिक कचरा टाकल्याचा आरोप; आरोग्य सर्वेक्षणाची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील पडेगाव घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातील कथित अनियमिततेचा मुद्दा सोमवारी विधान परिषदेत गाजला. शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी हा प्रश्न उपस्थित करत प्रकल्पाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्याची, क्षमतेपेक्षा अधिक कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आणि साठलेला कचरा वैज्ञानिक पद्धतीने कालबद्ध स्वरूपात हटविण्याची मागणी राज्य सरकारकडे केली.



दानवे यांनी सभागृहात सांगितले की, पडेगाव घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता मर्यादित असतानाही मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात आहे. त्यामुळे प्रकल्पात कचऱ्याचे मोठे ढिगारे साचले असून, तो प्रक्रिया प्रकल्प न राहता डम्पिंग ग्राउंडमध्ये बदलल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे मिथेनसह विषारी वायूंचे उत्सर्जन, दुर्गंधी आणि वारंवार लागणाऱ्या आगींमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असल्याचा आरोप त्यांनी केला.

पडेगाव परिसरातील नागरिकांची विशेष आरोग्य तपासणी झाल्याचा दावा वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे नमूद करत त्यांनी त्या भागातील नागरिकांचे स्वतंत्र आरोग्य सर्वेक्षण व वैद्यकीय तपासणी तातडीने करण्याची मागणी केली.

पडेगाव आणि चिकलठाणा येथील कचरा प्रकल्पांवर शासनाने सुमारे ६७ कोटी रुपये खर्च केले असतानाही अपेक्षित परिणाम दिसून येत नसल्याचे दानवे यांनी सांगितले. कचऱ्यापासून खतनिर्मिती, प्लास्टिक प्रक्रिया आणि इतर प्रकल्पांबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

याशिवाय प्रकल्प परिसरातील वायू व जलप्रदूषणाची नियमित तपासणी करण्यात यावी, कचऱ्यातून तयार होणाऱ्या दूषित द्रवावर (लिचेट) प्रक्रिया करणारी यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहे की नाही, याची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

## वृद्ध आई-वडिलावर अत्याचार करणाऱ्या मुलांसह सुनांवर गुन्हा दाखल

### शिवीगाळ करत मारण्याची धमकी , जिंतूर तालुक्यातील प्रकार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** वयोवृद्ध आई-वडिलाला सांभाळ न करत त्यांना शिवीगाळ व मारहाण करण्याचे धमकी देण्यात आली वरचेवर असेच प्रकार घडत असल्याने मुलांना आता वयोवृद्ध आई-वडील नकोसे झाले आहेत वयोवृद्धांना सुनेचा पण जाच सहन करावा लागत असून अशीच एक घटना जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथे घडली. मुले आणि सुनेच्या त्रासाला कंटाळून वृद्ध आई-वडिलांनी चक्क चारठाणा पोलीस स्टेशन गाठून अत्याचाराचा पाडाच वाचला व तक्रार दिली ज्येष्ठ नागरिकआणी पालक यांचे पालन पोषण आणि कल्याण अधिनियम अंतर्गत सहा जुलै रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी की सय्यद अख्तर यांनी तक्रार दिली आहे. फिर्यादीचे दोन्ही मुले त्यांच्यापासून वेगळी राहतात शेती विकून संबंधितांना पैसे वाटून दिलेले आहेत फिर्यादीची पत्नी बीमार असल्याने घरीच असते वृद्धांना कोणताही कामधंदा येत नाही घर खर्चासाठी पत्नीच्या उपचारासाठी पैसे मागितल्यानंतर मुले वाद करतात यात वृद्धाची कुचंबना होत असून कोणाचाही आधार नाही व आजारपणात उपचारासाठी त्यांची फार मोठी हेळसांड चालू आहे. तीन जुलै रोजी फिर्यादी घरी असताना मुलं आणि सुनेने गल्लीतील व्यक्तींना बोरचे पाणी देण्यावरून वाद घातला तुम्हाला खाण्यापिण्यास देणार नाही असे म्हणत शिवीगाळ केली मारण्याची धमकी देऊन दमदाटी केली याप्रकरणी सय्यद खैसर सय्यद हाफिज गुन्हा नोंदविण्यात आला आहे पोलीस पोलीस अधिकारी करत आहेत.

## ड्रेनेजमधून निघू लागल्या गरम वाफा; PNG गॅस गळतीची शक्यता, अग्निशमन दलाकडून युद्धपातळीवर शोध सुरु

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बजाजनगर येथील प्रताप चौक परिसरात सोमवारी (६ जुलै) सायंकाळी एक अत्यंत धक्कादायक आणि भीतीदायक प्रकार समोर आला आहे. येथील सार्वजनिक ड्रेनेज लाईनमधून अचानक मोठ्या प्रमाणावर गरम वाफा बाहेर येऊ लागल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. हा प्रकार इतका अचानक आणि वेगवान होता की, रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांसह स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये काही काळ प्रचंड भीतीचे वातावरण पसरले होते.

या घटनेची माहिती मिळताच वाळूज एमआयडीसी अग्निशमन दलाच्या जवानांनी



कसलाही विलंब न लावता तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून जवानांनी तातडीने ड्रेनेज लाईनच्या परिसरात कूलिंग ऑपरेशन सुरू केले असून, पाण्याचा मारा करून तापमान नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रताप चौक परिसरातून पीएनजी (Piped Natural Gas) म्हणजेच पाईपद्वारे पुरवली जाणारी नैसर्गिक गॅस वाहिनी गेलेली आहे. त्यामुळे ही गॅस लाईन कुठेतरी पंक्चर किंवा लीक झाली असावी आणि त्या गळतीमुळेच ड्रेनेजमध्ये हा बिघाड झाला असावा, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. दुसरीकडे, ड्रेनेजच्या आत साचलेल्या वायूमुळे किंवा इतर रासायनिक प्रक्रियेमुळे अंतर्गत आग लागली असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

मात्र, वाफा निघण्यामागचे नेमके आणि तांत्रिक कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेले नाही. सध्या सुरक्षिततेचा उपाय म्हणून अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनाकडून संपूर्ण परिसराची अत्यंत कसून पाहणी केली जात आहे. गॅस गळतीचा धोका लक्षात घेता, कोणतीही मोठी दुर्घटना किंवा जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासनाने नागरिकांना घटनास्थळापासून सुरक्षित अंतरावर राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच या भागातील गॅस पुरवठा काही काळासाठी खंडित करून तपासणीचा वेग वाढवला जाण्याची शक्यता आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे आणि परिसरात काही संशयास्पद हालचाल किंवा गॅसचा वास आल्यास तात्काळ नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## फेरफारसाठी 10 हजारांची लाच घेणारे मंडळ अधिकाऱ्याचे खाजगी मदतनीस जाळ्यात

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याच्या हतबलतेचा फायदा उठवून लाच उकळणाऱ्या दोन खाजगी इसमांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी रंगेहाथ पकडले. मौजे चिंचपूर येथील एका शेतकऱ्याच्या जमिनीचा फेर मंजूर करून देण्यासाठी या खाजगी मदतनीसांनी २० हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती १० हजार रुपये 'फोनपे' (PhonePe) द्वारे स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार शेतकऱ्याने २० नोव्हेंबर २०२५ रोजी मौजे चिंचपूर येथील गट क्रमांक १२३ मध्ये दोन गुंठे जमीन खरेदीखताद्वारे खरेदी केली होती. या जमिनीचा फेर तलाठी सजा कार्यालय पालोद यांच्याकडून मंडळ अधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी प्रलंबित होता. तक्रारदार यांनी याविषयी मंडळ अधिकाऱ्यांचे खाजगी मदतनीस अमोल बडक यांच्याकडे विचारणा केली असता, "मंडळ अधिकारी पालोद यांनी तुमचा फेर नामंजूर केला असून, तो मंजूर करून घेण्यासाठी त्यांना २०,००० रुपये द्यावे लागतील" असे सांगून लाचेची मागणी करण्यात आली.

रात्रंदिवस कष्ट करून काळ्या आईची सेवा करणाऱ्या शेतकऱ्याची लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी ६ जुलै रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे रीतसर तक्रार नोंदवली. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ७ जुलै रोजी शासकीय पंचांसमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये तडजोडीअंती १०,००० रुपये देण्याचे ठरले. आरोपी अमोल बडक याच्या सांगण्यावरून तक्रारदाराने ही लाचेची रक्कम आरोपी सचिन बडक याच्या 'फोनपे' अकाउंटवर डिजिटल स्वरूपात पाठवली. पैसे खात्यावर जमा झाल्याचे स्पष्ट होताच एसीबीच्या पथकाने तात्काळ झडप घालून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. याप्रकरणी सिल्लोड (शहर) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, आरोपींच्या घरांची झडती घेतली जात आहे.

## राममंदिर देणगी कथित गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी शिवसेनेचे 'रामरक्षा' आंदोलन

### साधू-संतांना निवेदने; मंदिरांमध्ये रामरक्षा पठण, चंद्रकांत खैरे यांची माहिती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरासाठी देशभरातील रामभक्तांनी दिलेल्या देणग्यांमध्ये कथित गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याच्या मागणीसाठी शिवसेनेने शहर व जिल्हाभर 'रामरक्षा' आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. आंदोलनाअंतर्गत साधू-संतांना निवेदने देण्यात येणार असून विविध राम व हनुमान मंदिरांमध्ये रामरक्षा पठण, हनुमान चालीसा, मारुती स्तोत्राचे सामूहिक पठण आणि महाआरतीचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी दिली.

यावेळी सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, माजी महापौर सुदाम सोनवणे, पद्माकर इंगळे, शहरप्रमुख दिग्विजय शेरखाने, विधानसभा संघटक वीरभद्र गादगे, गोपाळ कुलकर्णी, गिरीश चपळगावकर, नगरसेवक सचिन खैरे, नारायण जाधव, महिला आघाडीच्या सहसंपर्कसंघटक अनिता मंत्री, सुनीता देव, जिल्हासंघटक आशा दातार, सुकन्या भोसले, मीरा देशपांडे आदी उपस्थित होते.



खैरे म्हणाले की, राममंदिर उभारणीसाठी देशभरातील भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या देणग्यांमध्ये हजारो कोटी रुपयांचा कथित गैरव्यवहार झाल्याचे आरोप समोर आले आहेत. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. राममंदिर देणगी प्रकरणातील कथित गैरव्यवहार आणि वरिष्ठ विश्वस्तांच्या मनमानीला केंद्र व उत्तर प्रदेशातील सत्ताधारी भाजप सरकारचा राजाश्रय असल्याचाही आरोप त्यांनी केला.

राममंदिराशी संबंधित हा विषय हिंदू समाजाच्या श्रद्धेशी निगडित असल्याने त्याबाबतची माहिती सर्वसामान्य नागरिक आणि साधू-संतांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'रामरक्षा' आंदोलन राबविण्यात येणार असल्याचे खैरे यांनी स्पष्ट केले.

आज नरेंद्राचार्यांची भेट

पाथरी तालुक्यातील श्रीक्षेत्र सिमुरगव्हाण येथे सुरू असलेल्या जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या दर्शन व मार्गदर्शन सोहळ्यात बुधवारी (८ जुलै) त्यांची भेट घेऊन राममंदिर देणगी प्रकरणासंदर्भातील निवेदन सादर करण्यात येणार असल्याचे खैरे यांनी सांगितले.

## बातमीचा दणका : ग्रीव्हज कॉटन प्रशासनाने तातडीने रस्त्यावरील दूषित पाणी केले कायमचे बंद!

### मिसरवाडीतील मुख्य रस्त्याने घेतला मोकळा श्वास; नागरिकांकडन 'हिंदू प्रकाशवर्त'चे आभार

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील 'ग्रीव्हज कॉटन लिमिटेड' या कंपनीकडून रस्त्यावर सोडल्या जाणाऱ्या रासायनिक आणि दूषित पाण्यामुळे मिसरवाडी येथील मुख्य रस्ता जलमय झाला होता. पावसाळ्याच्या दिवसांत या समस्येने रौद्ररूप धारण केल्यामुळे स्थानिक नागरिक, शाळकरी मुले आणि वृद्धांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते. या गंभीर समस्येकडे प्रशासन आणि कंपनी व्यवस्थापनाचे लक्ष वेधण्यासाठी दैनिक हिंदू प्रकाशवर्त' ने वृत्त प्रसिद्ध करून आक्रमक भूमिका आणि पाठ पुरावा घेतला होता. या बातमीचा जोरदार प्रभाव पडला असून,






**"आमच्या हक्काचा आवाज बुलंद करत कंपनी प्रशासनाला ताळ्यावर आणल्याबद्दल आणि ही गंभीर समस्या कायमची मार्गी लावल्याबद्दल दैनिक हिंदू प्रकाशवर्त चे मनापासून आभार!"**

**— कचरू उत्तम कांबळे**

**(राज्य कार्याध्यक्ष, लहू प्रहार व स्थानिक नागरिक)**

ग्रीव्हज कॉटन कंपनी प्रशासनाने तातडीने पावले उचलत रस्त्यावरील दूषित पाणी कायमचे बंद केले आहे. रस्त्यावर साचणारे रासायनिक पाणी थांबवण्यासाठी कंपनीकडून तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यात आला असून, पाण्याचा प्रवाह सुरक्षित वाहिन्यांद्वारे वळवण्यात आला आहे.बातमीची गांभीर्याने दखल घेत ग्रीव्हज कॉटन लिमिटेडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पाण्याचा निचरा करण्यासाठी व दूषित पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू केले. त्यामुळे मिसरवाडीच्या मुख्य रस्त्याला आलेले तलावाचे स्वरूप आता पूर्णपणे नष्ट झाले असून, रस्ता वाहतुकीसाठी आणि पादचाऱ्यांसाठी सुरक्षित झाला आहे.

अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या आणि आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या या समस्येतून कायमची मुक्ती मिळाल्यामुळे मिसरवाडीतील नागरिकांनी, महिलांनी आणि वाहनधारकांनी मोठा सुटकेचा श्वास सोडला आहे.



ग्रीव्हज कॉटन कंपनीच्या दूषित पाण्यामुळे मिसरवाडीचा मुख्य रस्ता जलमय; संतप्त नागरिकांचा प्रशासनाला गुन्हा दाखल करण्याचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : एमआयडीसी चिकलठाणा येथील ग्रीव्हज कॉटन लिमिटेड या कंपनीमधून बाहेर पडणारे रासायनिक व दूषित पाणी थेट रस्त्यावर सोडले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने हे दूषित पाणी मिसरवाडी येथील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर साचले असून, या संपूर्ण परिसराला तलावाचे स्वरूप आले आहे. वारंवार तक्रारी करूनही कंपनी व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासन या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत, भाजपचे शक्ती केंद्रप्रमुख कचरू उत्तम कांबळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. तसेच प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे. मिसरवाडीतील नागरिकांना येण्या-जाण्यासाठी हा एकच मुख्य रस्ता आहे.

-> पान 2 वर

हा मुख्य रस्ता मिसरवाडीतील लोकांना एकमेव रस्ता आहे या पाण्यामुळे नागरिकांना येणे जाण्यास खूप त्रास होत आहे वाहने या पाण्यातून जाऊ शकत नाही शाळेतील मुलांना येण्याचा त्रास होत आहे वृद्धांना महिलांना खूप त्रास होत आहे या ग्रीव्हज कंपनीच्या व्यवस्थापकावर गुन्हा दाखल करण्यात यावा व योग्य ते काम करावे हे पाणी रस्त्यावर साठणार नाही याची कंपनीच्या व्यवस्थापकाने काळजी घ्यावी अन्यथा आम्ही सर्व मिसरवाडीतील नागरिक कंपनीला टाळे ठोकल्याशिवाय राहणार नाही.

- कचरू कांबळे
राज्य कार्याध्यक्ष लहू प्रहार

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## इंधनाचा दिलासा आणि जागतिक बाजारातील नवे वळण

भारतीय वाहनधारकांसाठी आणि पर्यायाने संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी जागतिक बाजारातून एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. जगातील सर्वात मोठी तेल निर्यातदार कंपनी 'सौदी अरामको'ने भारतासह संपूर्ण आशियाई ग्राहकांसाठी आपल्या कच्च्या तेलाच्या किमतीत केलेली ऐतिहासिक कपात ही देशांतर्गत इंधनाचे दर कमी होण्याच्या दृष्टीने एक मोठे आणि सकारात्मक पाऊल आहे. सौदी अरेबियाने घेतलेल्या या निर्णयामुळे भारताचा तेल आयात खर्च मोठ्या प्रमाणावर घटणार असून, गेल्या अनेक महिन्यांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्यांच्या खिशावर पडणारा ताण आता लवकरच कमी होण्याची चिन्हे आहेत. सौदी अरामकोने आपल्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या 'अरेब लाईट' या कच्च्या तेलाच्या किमतीत प्रति बॅरल अकरा डॉलरची केलेली ही कपात गेल्या दोन दशकांतील सर्वात मोठी घसरण मानली जात आहे. यापूर्वी कोरोना काळातील टाळेबंदीच्या वेळी जागतिक स्तरावर इंधनाची मागणी कमालीची घटली होती, तेव्हाच असे नीचांकी दर पाहायला मिळाले होते. भारत हा आपल्या गरजेच्या तब्बल ऐंशी टक्क्यांहून अधिक कच्चे तेल परदेशातून आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील अशा मोठ्या घसरणीचा थेट आणि मोठा फायदा भारतीय तेल कंपन्यांना आणि पर्यायाने ग्राहकांना मिळणे स्वाभाविक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात किमती युद्धपूर्व पातळीवर राहिल्यास देशात पेट्रोल-डिझेलसह एलपीजी सिलिंडरचे दर कमी केले जाऊ शकतात, असे संकेत पेट्रोलियम मंत्रालयाकडून आधीच मिळाले असल्याने या कपातीचे महत्त्व अधिक वाढले आहे. या जागतिक घडामोडींमागे अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविरामाची शक्यता आणि त्यामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाचा वाढणारा पुरवठा ही मुख्य कारणे मानली जात आहेत. इंधनाचे दर कमी झाल्यास केवळ वाहनधारकांनाच दिलासा मिळत नाही, तर मालवाहतुकीचा खर्च कमी होऊन बाजारातील महागाईवरही नियंत्रण मिळवणे शक्य होते. आता आंतरराष्ट्रीय बाजारातील या घसरणीचा लाभ भारतीय ऑईल मार्केटिंग कंपन्या सर्वसामान्य ग्राहकांपर्यंत किती वेगाने पोहोचवतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जागतिक अर्थकारणातील हे बदल भारतासारख्या विकसनशील देशासाठी निश्चितच ऊर्जा क्षेत्राला नवसंजीवनी देणारे ठरणार आहेत.

## शिवना ग्रामपंचायतीत एसआयआर विशेष पुनरीक्षण मोहिमेचा आढावा

### गटविकास अधिकारी यांचे बीएलओंना मार्गदर्शन



**अजिंठा प्रतिनिधी :** मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सिल्लोड तालुक्यातील शिवना ग्रामपंचायत कार्यालयात बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांची आढावा बैठक पार पडली. बैठकीस गटविकास अधिकारी रत्नागर पगार प्रमुख उपस्थित होते.

बैठकीत एसआयआर मोहिमेअंतर्गत मतदार यादी शंभर टक्के अचूक व अद्ययावत करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नवीन मतदारांची नोंदणी, मृत व स्थलांतरित मतदारांची नावे नियमानुसार वगळणे, तसेच प्रत्येक पात्र मतदाराची माहिती घरोघरी जाऊन पडताळून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून निर्धारित मुदतीत सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश गटविकास अधिकारी रत्नागर पगार यांनी दिले.

यावेळी एसआयआर मोहिमेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बीएलओंना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन करण्यात आले. मतदार यादी अधिक पारदर्शक, अचूक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी सर्व संबंधितांनी जबाबदारीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी याहिया सर, कलीम सर, विजय काळे, झानगीर सर, परवेज सर, शाफकत सर, रिजवान सर,संतोष वाघ, अशरफ काजी सर,शेषराव जगताप सर,समद सर,तसेच अंगणवाडी सेविका विमल मुठे, आरती चितळे, सुनीता जगताप यांच्यासह बीएलओ, संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

## ताजमहाल 'तेजो महालय' होता का ? हायकोर्टाने केंद्र सरकार आणि एएसआयकडे मागितले उत्तर

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशच्या आग्रा येथील ताजमहाल हे मूळचे 'तेजो महालय' हिंदू मंदिर होते का, या दाव्याशी संबंधित याचिकेवर अलाहाबाद उच्च न्यायालयाने सोमवारी सुनावणी घेतली. न्यायालयाने या प्रकरणात ताजमहालाचे सर्वेक्षण करण्यासाठी ॲडव्होकेट कमिशन नियुक्त करण्याच्या मागणीवर केंद्र सरकार आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.न्या. रोहित रंजन अग्रवाल(Ranjan Agrawal) यांच्या एकल खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांनी ताजमहालाच्या स्थापत्य आणि संरचनात्मक वैशिष्ट्यांचे सर्वेक्षण करून त्याचे दस्तऐवजीकरण करण्याची मागणी केली. त्यांच्या मते, यामुळे त्यांच्या दाव्याशी संबंधित पुरावे न्यायालयासमोर मांडणे शक्य होईल. हा वाद 2015 मध्ये आग्रा येथे दाखल झालेल्या दिवाणी खटल्याशी संबंधित आहे. याचिकाकर्ते हरिशंकर जैन आणि इतर 5 भाविकांनी दावा केला आहे की, ताजमहाल मूळचा 'तेजो महालय' नामक शिव मंदिर होते. नंतर मुघल सम्राट शाहजहानच्या काळात त्याचे मुमताज महलच्या मकबऱ्यात रूपांतर करण्यात आले.

# वेगाच्या युगात माणूसपणाचा शोध

### शॉर्टकटच्या दुनियेत हरवलेला निवांतपणा

### वेगाच्या युगात माणूसपणाचा शोध

### "वेग वाढला, पण वेळ कमी पडली; सुविधा वाढल्या, पण संवेदना विरळ झाल्या. संपर्क वाढले, पण संवाद कमी झाला; जग जवळ आले, पण मनांचे अंतर वाढले."





मानवजातीचा इतिहास हा प्रगतीचा इतिहास आहे. चाकाच्या शोधापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा प्रवास हा मानवी बुद्धिमत्तेचा अद्भुत विजय आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने आपल्या जीवनाला वेग, सुविधा आणि अमर्याद संधी दिल्या. आज एका क्षणात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी संवाद साधता येतो, ज्ञानाची विशाल दालने उघडतात आणि अनेक कठीण कामे काही मिनिटांत पूर्ण होतात. ही प्रगती निश्चितच अभिमानास्पद आहे.

तरीही एक प्रश्न मनाला वारंवार स्पर्श करून जातो—सुविधांच्या शोधात आपण जगण्याची सहजता, नात्यांची ऊब आणि निवांतपणाचा आनंद तर हरवत नाही ना?

आजचे जग वेगाचे आहे. प्रत्येक गोष्ट Instant हवी आहे. Instant Food, One-Click Shopping, Express Delivery, Short Videos, —सगळे काही झटपट. पण जीवनातील काही गोष्टी अशा आहेत की त्यांना शॉर्टकट नसतो. विश्वास कमवावा लागतो, मैत्री जपावी लागते, प्रेमाला वेळ द्यावा लागतो आणि संस्कार जगावे लागतात.

आपल्या दैनंदिन जीवनातही हा बदल स्पष्ट दिसतो. पूर्वी सकाळची सुरुवात घरातील वडीलधाऱ्यांच्या आशीर्वादाने किंवा शेजाऱ्याशी दोन शब्द बोलून व्हायची. आज अनेकदा दिवसाची सुरुवात मोबाईलच्या स्क्रीनवरून होते. "GM" आणि "GN" चे संदेश शेकडो लोकांना एका क्षणात पोहोचतात; परंतु कधी कधी त्या दोन अक्षरांपेक्षा समोरासमोर हसून म्हटलेले "शुभ प्रभात" मनाला अधिक प्रसन्न करून जाते.

थोडा हलकाफुलका विनोद करायचा तर आज काही लोक इतके व्यस्त असतात की, वाढदिवसाच्या शुभेच्छाही मोबाईल आधी देतो आणि त्यांना नंतर आठवते की आज कोणाचा वाढदिवस आहे! तंत्रज्ञानाची ही सोय नक्कीच उपयोगी आहे; पण ती आपली आठवण, आपुलकी आणि सहभाग यांची जागा घेऊ नये.

कोरोना महामारीने संपूर्ण जगाला एक मोठा धडा शिकवला. इंटरनेट, व्हिडिओ कॉल आणि डिजिटल माध्यमांनी शिक्षण, आरोग्यसेवा आणि कामकाज सुरू ठेवण्यास मोठी मदत केली. परंतु त्याच काळात जगाने हेही अनुभवले की आईची मिठी, मित्राचा खांदा, शिक्षकांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि शेजाऱ्याची वेळेवर केलेली मदत यांना कोणताही डिजिटल पर्याय नाही. तंत्रज्ञान जोडते; पण जिव्हाळा माणूसच निर्माण करतो.

जगभरातही या विषयावर गांभीर्याने विचार सुरू आहे. जागतिक आरोग्य संघटना (WHO) सामाजिक नातेसंबंध आणि मानसिक आरोग्य यांचा परस्परसंबंध अधोरेखित करते. अनेक देश Digital Wellbeing आणि Screen-Free Time यांसारख्या संकल्पनांना प्रोत्साहन देत आहेत. जपानमध्ये Shinrin-yoku म्हणजे निसर्गाच्या सान्निध्यात निवांत वेळ घालवण्याची परंपरा आहे. डेन्मार्कमधील Hygge जीवनशैली साधेपणा, कुटुंबाचा सहवास आणि अंतःशांती यांना महत्त्व देते. भूतानने तर Gross National Happiness या संकल्पनेद्वारे आनंदालाच विकासाचा महत्त्वाचा निकष मानले आहे. ही उदाहरणे सांगतात की खरे समृद्ध जीवन केवळ आर्थिक प्रगतीत नसून मानवी नात्यांत आणि मानसिक समाधानात आहे.

भारतीय संस्कृतीनेही हजारो वर्षांपासून हाच संदेश दिला आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही भावना संपूर्ण जगाला एका कुटुंबासारखे पाहायला शिकवते. संत ज्ञानेश्वरांचे "विश्वचि माझे घर" आणि संत तुकारामांचे करुणा, समता व प्रेम यांचे विचार आजही तितकेच ताजे आणि प्रेरणादायी आहेत. महात्मा गांधींनी साधेपणाचा मार्ग दाखवला, तर डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी विज्ञान आणि मूल्ये यांचा सुंदर समन्वय घडवून आणण्याचे आवाहन केले.

याचा अर्थ तंत्रज्ञान चुकीचे आहे, असा अजिबात नाही. उलट, योग्य वापर केल्यास ते शिक्षण, संशोधन, आरोग्य, शेती, पर्यावरण संरक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही; प्रश्न त्याच्या वापरातील समतोलाचा आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे; साध्य नाही.

आज प्रत्येकाने स्वतःला एक छोटासा प्रश्न विचारण्याची गरज आहे—दिवसभरात आपण स्क्रीनकडे जास्त पाहतो की आपल्या माणसांकडे? मुलांशी, पालकांशी, मित्रांशी किंवा शेजाऱ्यांशी आपण मनापासून किती वेळ बोलतो? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरेच आपल्याला योग्य दिशा दाखवतील.

दररोज काही वेळ मोबाईल बाजूला ठेवून पुस्तक वाचणे, कुटुंबासोबत जेवण करणे, मुलांबरोबर खेळणे, ज्येष्ठांचे अनुभव ऐकणे, झाडांशी आणि निसर्गाशी मैत्री करणे, एखाद्या मित्राला फक्त भेटण्यासाठी भेटणे—या छोट्या सवयी जीवन अधिक समृद्ध करतात. या क्षणांमध्ये पैशाची किंमत नसते; पण आयुष्याची श्रीमंती दडलेली असते.

"शब्दांत ऊब असू दे,
नात्यांत ओलावा असू दे;
वेगाला विवेक लाभू दे,
जीवनात निवांतपणा नांदू दे."

खरी प्रगती ही केवळ वेगात नसते; ती विवेकात असते. खरी समृद्धी ही केवळ संपत्तीत नसते; ती समाधानात असते. खरे यश केवळ उंच इमारती बांधण्यात नसते; ते मजबूत नाती उभारण्यात असते. आणि खरे आधुनिकपण केवळ नव्या तंत्रज्ञानात नसते; ते जुन्या मूल्यांना नव्या काळात जपण्यात असते.

म्हणूनच आजची गरज तंत्रज्ञानाला नाकारण्याची नाही, तर त्याला योग्य स्थान देण्याची आहे. सुविधा स्वीकारूया; पण संवेदना जपूया. वेग स्वीकारूया; पण विवेकही सोबत ठेवूया. डिजिटल जगाचा लाभ घेऊया; पण मानवी स्पर्शाचे महत्त्व विसरू नका.

कारण आयुष्य हे केवळ स्क्रीनवर स्क्रोल करण्यासाठी नाही; ते माणसांमध्ये राहून, मनापासून हसण्यासाठी, प्रेमाने जगण्यासाठी आणि सुंदर आठवणी निर्माण करण्यासाठी आहे. निवांतपणाचे हे छोटे क्षणच उद्याच्या आनंदी, निरोगी आणि सुसंस्कृत समाजाची खरी पायाभरणी ठरतील.

- पांडुरंग मारुती धुमाळ

# माझ्या समाजबांधवांनो, माझ्या संघर्षाचे मोल जपा : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हृदयस्पर्शी संदेश



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण आयुष्य हे केवळ एका व्यक्तीचे चरित्र नाही; भारतातील कोट्यवधी वंचित, शोषित आणि पीडित समाजाच्या मुक्तीचा इतिहास आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात जे काही मिळवले, ते स्वतःच्या सुखासाठी नव्हे, तर समाजाच्या सन्मानासाठी मिळवले. त्यांच्या प्रत्येक संघर्षामागे एकच ध्येय होते "माझा समाज माणूस म्हणून जगला पाहिजे."डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला अनेक वेळा आपल्या भाषणांमधून संदेश दिले. हे संदेश केवळ भाषणापुरते नव्हते, तर त्यांच्या आयुष्यातील सत्य घटनांमधून जन्माला आले होते. त्यांनी सांगितले होते, "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." ही तीन शब्दांची शिकवण म्हणजे समाजाच्या भविष्याचा मार्गदर्शक दीप आहे.एक सत्य घटना आजही मनाला स्पर्श करते. आयुष्याच्या अखेरच्या काळात बाबासाहेबांची प्रकृती अत्यंत खालावली होती. मधुमेह, रक्तदाब आणि इतर अनेक व्याधींनी त्यांचे शरीर थकले होते. डॉक्टरांनी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला होता. पण बाबासाहेब म्हणाले, "माझे शरीर थकले असेल, पण माझ्या समाजाचे काम अजून पूर्ण झालेले नाही."याच काळात ते "The Buddha and His Dhamma" या महान ग्रंथाचे लेखन पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेत होते. त्यांचे विश्वासू सहकारी नानकचंद रतू त्यांच्यासोबत असत. बाबासाहेब अनेकदा वेदना सहन करत काम करत. रतूंनी त्यांना विश्रांती घेण्याचा आग्रह केला. त्यावर बाबासाहेबांनी अत्यंत भावनिक शब्दांत सांगितले

"जर मी थांबलो, तर माझा समाज पुन्हा अंधारात जाईल. माझ्या लोकांसाठी मला शेवटच्या श्वासापर्यंत काम करायचे आहे."

हे शब्द केवळ एका नेत्याचे नव्हते; ते एका पित्याचे आपल्या लेकरांसाठी असलेले प्रेम होते.बाबासाहेबांनी संविधान लिहिले. पण त्यांना माहिती होते की संविधान कितीही चांगले असले, तरी ते चालवणारे लोक चांगले नसतील तर समाजाचे नुकसान होईल. म्हणून त्यांनी समाजाला शिक्षण, नैतिकता आणि बंधुभावाचा मार्ग दाखवला.

त्यांनी कधीही समाजाला द्वेष शिकवला नाही. त्यांनी अन्यायाविरुद्ध लढायला शिकवले; पण माणुसकी सोडू नका, असेही सांगितले. ते म्हणत, "स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांशिवाय कोणताही समाज महान होऊ शकत नाही."

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह त्यांनी बौद्ध धम्म स्वीकारला. तो केवळ धर्मांतराचा कार्यक्रम नव्हता; तो आत्मसन्मानाचा, विवेकाचा आणि मानवतेचा नवा जन्म होता. त्यांनी आपल्या अनुयायांना सांगितले की अंधश्रद्धा, जातिभेद आणि अन्यायापासून दूर राहा. ज्ञानाचा स्वीकार करा.आज आपण स्वतःला बाबासाहेबांचे अनुयायी म्हणतो; पण त्यांच्या शिकवणीचे किती पालन करतो? त्यांनी शिक्षणावर भर दिला, पण आपण शिक्षणाकडे दुर्लक्ष करतो. त्यांनी संघटन शिकवली, पण आपण मतभेदांत अडकतो. त्यांनी संघर्ष शिकवला, पण आपण अनेकदा आपापसांतच संघर्ष करतो. हीच बाबासाहेबांना सर्वात मोठी वेदना झाली असती.समाजातील तरुणांनी बाबासाहेबांच्या विचारांचे केवळ घोषवाक्य करू नये, तर ते आपल्या जीवनात उतरवावे. प्रत्येक घरात पुस्तके असावीत. प्रत्येक मुलगा-मुलगी उच्च शिक्षित व्हावी. प्रत्येक कुटुंब संविधानाचा सन्मान करणारे असावे. हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल.

आज समाजासमोर अनेक नवी आव्हाने आहेत बेरोजगारी, व्यसनाधीनता, सोशल मीडियावरील द्वेष, अंधश्रद्धा आणि परस्परांतील मतभेद. या सर्वांवर उपाय बाबासाहेबांनी आधीच दिला आहे शिक्षण, विवेक, संघटन आणि सामाजिक जबाबदारी.

बाबासाहेबांनी आयुष्यभर कधीही वैयक्तिक संपत्ती जमवली नाही. त्यांनी आपल्या बुद्धीचे, परिश्रमाचे आणि वेळेचे दान समाजाला दिले. म्हणूनच आज प्रत्येक समाजबांधवाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे "मी समाजासाठी काय करत आहे?"आपल्या समाजातील एखाद्या गरीब विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत करणे, एखाद्या गरजूला आधार देणे, महिलांच्या शिक्षणासाठी काम करणे, संविधानाची जाणीव करून देणे, व्यसनमुक्तीचा संदेश देणे हीच बाबासाहेबांच्या विचारांची खरी पूजा आहे.बाबासाहेबांचे जीवन सांगते की परिस्थिती कितीही कठीण असली तरी माणूस शिक्षण, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर इतिहास घडवू शकतो. त्यांनी अस्पृश्यतेच्या अंधारातून जगातील सर्वोच्च विद्यापीठांपर्यंतचा प्रवास केला. हा प्रवास प्रत्येक युवकासाठी प्रेरणादायी आहे.आज जर बाबासाहेब आपल्या समोर उभे राहिले असते, तर कदाचित ते एवढेच म्हणाले असते

"माझ्या समाजबांधवांनो, मी तुम्हाला हक्क दिले; आता त्यांचे संरक्षण करा. मी तुम्हाला संविधान दिले; त्याचे पालन करा. मी तुम्हाला शिक्षणाचा मार्ग दाखवला; तो सोडू नका. मी तुम्हाला एकतेची ताकद दिली; ती तुटू देऊ नका. माझे पुतळे उभारण्यापेक्षा माझे विचार उभारा. माझ्या नावाने घोषणा देण्यापेक्षा माझ्या तत्त्वांनुसार जीवन जगा." हा संदेश आजही तितकाच जिवंत आहे. कारण बाबासाहेबांचे विचार काळाच्या पलीकडचे आहेत. ते कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नाहीत; ते संपूर्ण मानवजातीसाठी आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या उन्नतीसाठी अर्पण केले. त्यांच्या संघर्षाचे मोल आपण तेव्हाच जपू शकतो, जेव्हा आपण शिक्षणाला प्राधान्य देऊ, समाजात एकता राखू, संविधानाचे मूल्य जपू आणि मानवतेचा मार्ग स्वीकारू.

त्यांच्या जीवनातील प्रत्येक सत्य घटना आपल्याला एकच संदेश देते "स्वतः उभे रहा, इतरांनाही उभे करा आणि समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन चला."हीच बाबासाहेबांना खरी मानवंदना, हीच त्यांच्या संघर्षाला खरी कृतज्ञता आणि हीच आपल्या पुढील पिढ्यांसाठी सर्वात मोठी सामाजिक जबाबदारी आहे.

लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

**लेखक : समाजभूषण रामदास वच्छालामाई रखमाजी वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं. 8888125610**

# कर्जमुक्तीमुळे मराठवाड्यातील शेतीला मिळणार नवी उभारी

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**

**परभणी:**शेतकरी समृद्ध तर राज्य समृद्ध" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' जाहीर केली आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देऊन त्यांना नव्याने शेती करण्यासाठी सक्षम करणे आणि कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा देणे हा या योजनेमागील मूलभूत उद्देश आहे.

मराठवाडा हा दुष्काळ, अवर्षण, अतिवृष्टी आणि हवामान बदलाच्या सततच्या संकटांना सामोरा जाणारा प्रदेश आहे. अनियमित पाऊस, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने राबविलेली ही कर्जमुक्ती योजना मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरणार आहे.

योजनेअंतर्गत पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीककर्जाची कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या थकबाकीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळणार आहे.

या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही न्याय देण्यात आला आहे. वेळेवर कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रामाणिक कर्जफेडीला प्रोत्साहन मिळेल आणि आर्थिक शिस्तही वाढीस लागेल.

जुलै २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने रक्कम वितरित केली जाईल. त्यामुळे लाभार्थ्यांना कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट लाभ मिळणार आहे.

योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि प्रभावी व्हावी यासाठी राज्यभरात आवश्यक प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मराठवाड्यातील आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी) आणि महा-ई-सेवा केंद्रांवर पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण सुरू आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांकडून पात्र कर्जदारांची माहिती शासनाच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी काही बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे. आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न असणे, केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे, सीएससी केंद्रावर बायोमेट्रिक प्रमाणीकरण करून त्याची पावती जपून ठेवणे या बाबी वेळेत पूर्ण केल्यास लाभ मिळण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

योजनेचा लाभ १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीककर्जासाठी लागू आहे. संबंधित कर्ज ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असावे आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड झालेली नसावी. या निकषांची पूर्तता करणारे पात्र शेतकरी कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत.

या योजनेचा लाभ छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, नांदेड, धाराशिव आणि हिंगोली या मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पात्र शेतकऱ्यांना मिळणार आहे.

कर्जमुक्तीमुळे शेतकरी पुन्हा नव्याने पीककर्ज घेऊ शकतील, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करू शकतील आणि शेतीमध्ये अधिक गुंतवणूक करण्याचा आत्मविश्वास मिळवू शकतील.

कर्जमुक्ती ही केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारे पाऊल आहे. शासनाच्या या निर्णयामुळे मराठवाड्यातील हजारो कुटुंबांना दिलासा मिळेल, शेतीची उत्पादकता वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल. शेतकरी सक्षम झाला तरच कृषी क्षेत्र सक्षम होईल आणि कृषी क्षेत्र सक्षम झाले तर राज्याच्या विकासाला अधिक बळ मिळेल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ ही त्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीचे पाऊल ठरणार आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणूकीत विजयी झाल्याबद्दल प्रभाकर काळे यांचा सत्कार



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.७ जुलै

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सोयगाव येथील शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर आबा काळे यांनी दणदणीत विजय मिळविला त्यानिमित्ताने सोहनी सी.एस.सी.सेंटर येथे कृषिभूषण शेतकरी अरुण सोहनी यांच्या वतीने जाहीर सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शाल व श्रीफळ देऊन विजयी झालेले प्रभाकर आबा काळे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी गुरुकृपाचे संचालक दिनेश पंडित,भगवान वाघ,आरोग्य दूध दिगंबर वाघ उपस्थित होते.

# इद्रिस मुलतानी यांची (राज्यमंत्री दर्जा) नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार



**सावळदबारा प्रतिनिधी :** इद्रिस मुलतानी यांची मुस्लिम समाजाच्या राज्यस्तरीय अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी ( राज्यमंत्री दर्जा ) नियुक्ती झाल्याबद्दल त्याचा सावळदबारासह परिसरातील विविध गावांमध्ये भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला.

इद्रिस मुलतानी हे दि. ५ जुलै रोजी सावळदबारा सर्कलच्या दौऱ्यावर आले असता सावळदबारासह रवळा,जवळा,पिपळा,जामठी, टिटवी, पळसखेडा,घाणेगाव, नादाताडा, नादागाव, डाभा,पिपळवाडी, महालब्धा, मूर्ती, आदी परिसरातील विविध गावांतील ग्रामस्थ. भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्याची भेट घेऊन सत्कार केला. तसेच अनेक ठिकाणी फटाक्यांची आतषबाजी व ढोल वाजत त्यांचे स्वागत करण्यात आले.

सावळदबारा येथे भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालयात इद्रिस मुलतानी यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी ढोल वाजवत, फटाके फोडून आणि जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले.सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव कोलते यानी मिठाई वाटप केली होती उपस्थित कार्यकर्ते व नागरिकांनी इद्रिस मुलतानी यांना शुभेच्छा दिले

यावेळी व्हीजेएनटीचे प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, सभापती उत्तम चव्हाण, पंचायत समिती सदस्य राहुल राठोड,गजानन पवार, माजी प्राचार्य नारायण कोलते, भावराव कोलते,प्रमोद पाटील, गणेश लोखडे, माजी सरपच आज्ञासिंग चव्हाण,प्रदिप चव्हाण, मोरसिंग चव्हाण, वर्धन चव्हाण, लवकेश जाधव,अनिल राठोड,गजानन गट, रामचंद्र चिमणकर, एकनाथ सपाटे, विजय रावळकर,शांताराम खराटे,संजय चव्हाण,देवाअप्पा पधाडे, पंढरी साबळे, शंकर आवसमोल, आजबराव चव्हाण, मधुकर गावडे, विठ्ठल टिकारे, डॉ. जफ्फर सय्याद, मुनाफ सय्याद, दिनकर शिपल्कर, राजू दाडगे, बेल आप्पा पंधाडे, सुनिल शिपल्कर,दीपक गावडे, यश टिकारे, मयुर रावळकर,यांच्यासह परिसरातील अनेक ग्रामस्थ, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'पुरुषस्य भाग्यम' कादंबरीचे दिमाखदार प्रकाशन; साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत रंगला कवी संमेलनाचा सुरेल मेळावा


## माधव मनोहर जोशी यांच्या वास्तवाधारित कादंबरीचे प्रकाशन; मान्यवरांनी केले कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** :सिडको येथील गीता भवन येथे साहित्यिक माधव मनोहर जोशी लिखित 'पुरुषस्य भाग्यम' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारुरकर यांच्या हस्ते कादंबरीचे प्रकाशन झाले. यावेळी ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्योतिर्मय प्रकाशनचे संजय व्यापारी, ज्येष्ठ हास्यकवी प्रा. विजय पोहनकर तसेच संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते रघुवीर ओक यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

लेखक माधव मनोहर जोशी यांनी मनोगतात सांगितले की,



'पुरुषस्य भाग्यम' ही कादंबरी त्यांनी ज्या उद्योगसमूहात कार्य केले, त्या मालकाच्या सत्य जीवनप्रवासावर आधारित आहे. भारत-पाकिस्तान फाळणीनंतर सिंध प्रांतातून मुंबईत आलेल्या अनंत वाळिंबे या नायकाचा संघर्ष, मोलमजुरीपासून हार्डवेअर उद्योगातील यशस्वी उद्योजक बनण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास या कादंबरीत प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. अनेक हृदयस्पर्शी प्रसंग वाचकांना अंतर्मुख करतात, असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुणे सुधीर कोर्टीकर यांनी कादंबरीतील नायकाचा संघर्ष लेखकाने प्रभावी भाषाशैलीत उभा केला असून तो थेट वाचकांच्या मनाला भिडतो, असे सांगितले. माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारुरकर यांनी ही कादंबरी मराठी साहित्यविश्वात उल्लेखनीय ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. प्रा. विजय पोहनकर यांनी ही कादंबरी संघर्षातून यश मिळविण्याची प्रेरणा देणारी असल्याचे सांगितले.

प्रकाशक संजय व्यापारी यांनी ज्योतिर्मय प्रकाशनने गेल्या आठ महिन्यांत १४ पुस्तकांचे प्रकाशन केले असून आणखी १२ पुस्तके प्रकाशनाच्या प्रक्रियेत असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रा. विजय पोहनकर यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन रंगले. मुकुंद भालेराव, बलराज संघई, मनोरमा बोराडे, अरविंद कुलकर्णी, मनोज अग्रवाल, गिरीश वसेकर (पुणे), रचना वसेकर (पुणे), रघुवीर केळकर, रमेश भिसे, डॉ. रावसाहेब कळसे, माधव जोशी (मुंबई), विनया जोशी (मुंबई) तसेच विद्यार्थी कवी योगराज यांनी आपल्या कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली.

समारोपावेळी प्रा. विजय पोहनकर यांनी हास्यकवितांचे सादरीकरण करून उपस्थितांना खळखळून हसविले. सहभागी सर्व कवींना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# कृषी सप्ताहानिमित्त मोढा बुद्रुक येथे शेतकरी मार्गदर्शन शिबिर संपन्न



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**सिल्लोड** : मौजे मोढा बुद्रुक, ता. सिल्लोड येथे कृषी विभागाच्या वतीने कृषी सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी शेतकरी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरास परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. प्रमुख मार्गदर्शक कृषी अधिकारी श्री. सुनील सूर्यवंशी यांनी सघन कापूस लागवड पद्धती, हुमणी अळीचे एकात्मिक नियंत्रण व खतांचा शास्त्रीय वापर याबाबत सविस्तर माहिती दिली.

विस्तार अधिकारी (कृषी) श्री. विश्वास बनसोडे यांनी मका व कापूस पिकातील आधुनिक तंत्रज्ञान, एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) व बीज प्रक्रियेचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. सहाय्यक गट विकास अधिकारी श्री. आशिष मस्के यांनी कृषी सप्ताहाचे महत्त्व सांगून शासकीय घरकुल योजनेतील अडचणींवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सरपंच सौ. हावळे, श्री. संभाजी हावळे, श्री. राजेंद्र लांडगे, विस्तार अधिकारी श्री. जोगेंद्र अहिरराव यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आधुनिक तंत्रज्ञान व शास्त्रीय शेती पद्धतीची माहिती मिळाल्याबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला नवी गती

## राज्यात 116 प्रशिक्षण बॅचेस पूर्ण; 5,010 अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**परभणी** : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्या सनियंत्रणाखाली सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आयुष्मान भारत - समग्र प्राथमिक आरोग्य सेवा (CPHC) अंतर्गत राज्यातील प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी दोन दिवसीय उजळणी प्रशिक्षण शिबिरांचे राज्यव्यापी आयोजन करण्यात आले आहे. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला अधिक प्रभावीपणे गती देण्यासाठी हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.

राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी, आशा पर्यवेक्षक आणि आशा स्वयंसेविका अशा प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावरील सर्व कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणामध्ये सहभागी करून घेतले जात आहे. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, अद्ययावत आणि रुग्णकेंद्रित करण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि प्रत्यक्ष कामकाजातील सुधारणा या प्रशिक्षणातून दिल्या जात आहेत. राज्यात आजपर्यंत ११६ प्रशिक्षण बॅचेस यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या असून ५,०१० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. प्रत्येक जिल्ह्यातून १० प्रशिक्षकांची निवड करून त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रशिक्षणाची गुणवत्ता, एकसमानता आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी अनुभवी मेंटर्स तसेच जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रशिक्षणाची विशेष बाब म्हणजे केवळ वर्गातील व्याख्यानांपुरते प्रशिक्षण मर्यादित न ठेवता प्रात्यक्षिकांवर आधारित अध्यापन आणि समुदाय सहभागावर आधारित प्रत्यक्ष प्रशिक्षण यावर विशेष भर देण्यात आला आहे. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष गावामध्ये गृहभेटी, नागरिकांशी आरोग्य संवाद, कुटुंबांना आरोग्यविषयक मार्गदर्शन, आजारांचे लवकर निदान,जोखीम असलेल्या व्यक्तींची ओळख आणि आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा याविषयी प्रत्यक्ष अनुभव दिला जात आहे.

आयुष्मान भारत अंतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिरांमार्फत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या समग्र प्राथमिक आरोग्य सेवेच्या १३ सेवा पॅकेजेस या प्रशिक्षणात सविस्तर शिकविण्यात येत आहेत. यामध्ये मातृ व बाल आरोग्य, नवजात शिशु सेवा, किशोरवयीन आरोग्य, कुटुंब नियोजन, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे व्यवस्थापन, मानसिक आरोग्य, वृद्धापकाळातील आरोग्य सेवा, आपत्कालीन आरोग्य सेवा, नेत्र व कर्ण आरोग्य, मौखिक आरोग्य, योग व आयुष उपचार पद्धती, आरोग्य संवर्धन, गुणवत्ता सुधारणा, डेटा व्यवस्थापन, अहवाल लेखन आणि समुदायाधारित आरोग्य सेवा वितरण यांचा समावेश आहे. 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक गावात आरोग्याची लोकचळवळ उभारण्याचा सार्वजनिक आरोग्य विभागाचा संकल्प असून, त्यासाठी सक्षम, प्रशिक्षित आणि संवेदनशील मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरत आहे. प्रशिक्षणानंतर आयुष्मान आरोग्य मंदिरांमार्फत नागरिकांना अधिक दर्जेदार, सर्वसमावेशक, सुलभ आणि रुग्णाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असा विश्वास सार्वजनिक आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

# क्रीडागंण व व्यायामशाळा विकास योजनांसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी द्वारे क्रीडागंण विकास अनुदान योजना व व्यायामशाळा विकास अनुदान योजनेसाठी दि. 07 जुलै, २०२६ ते दि. 22 जुलै २०२६ या कालावधीत प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी केले.

व्यायामशाळा विकास अनुदान योजना या उपक्रमांतर्गत दैनंदिन दिनचर्यामध्ये फिटनेसचा समावेश करण्याच्या उद्देशाने लठ्ठपणाशी लढण्यासाठी, आपल्या तंदुरुस्तीच्या व्यवस्थेचा एक महत्वाचा भाग म्हणुन संतुलीत शारीरिक व्यायाम आणि हालचाली करणे अत्यावश्यक आहे. निरोगी राष्ट्राच्या उभारणीत नियमित शारीरिक व्यायाम आणि खेळांचे महत्व नागरिकांमध्ये रुजावे याकरीता हे दोन महत्वकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

क्रीडागंण विकास अनुदान योजना व व्यायामशाळा विकास अनुदान योजनाचे प्रस्ताव दि. 22 जुलै २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी येथे सादर करण्यात यावे अधिक माहिती करीता सुयश नाटकर (क्रीडा अधिकारी) ९७६३९९४८४६ - (व्यायामशाळा विकास योजना) आणि रोहन औंढेकर (क्रीडा अधिकारी) - ८९९९३३७९२९ (क्रीडागंण विकास योजना) यांच्याशी संपर्क साधावा.

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद शाळा, महानगर पालिका, नगर पालिका, नगर पंचायत, शासकीय संस्था व शैक्षणीक संस्था ज्या पाच वर्षापुर्वी १०० टक्के अनुदानीत आहेत अशानाच अनुदानास पात्र असतील, असे श्रीमती साखरे यांनी कळविले आहे.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात वन महोत्सव संपन्न




हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.७ जुलै

निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे,असे प्रतिपादन संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी केले. संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने १ जुलै ते ७ जुलै २०२६ दरम्यान महाविद्यालयाच्या परिसरात 'वन महोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ.शिरीष पवार व उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंबा,वड, पिंपळ,कडुलिंब यासारख्या छायादार विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.'झाडे लावा,झाडे जगवा' हा संदेश देत विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.सर्व उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी लावलेली झाडे जगवण्याची आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याची सामूहिक शपथ घेतली.

यावेळी बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील चौधरे म्हणाले की,"केवळ झाडे लावणे पुरेसे नाही,तर त्यांचे संगोपन करणे ही आपली जबाबदारी आहे. महाविद्यालयाने यावर्षी दत्तक वृक्ष योजना सुरू केली असून,प्रत्येक विद्यार्थी एका झाडाची निगा राखणार आहे.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपक पारधे यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ.शिवाजी शिरसाट यांनी केले.

# पत्रकार स्वातंत्र्यावर घाला ; संपादक बालासाहेब कडबाने यांच्यावर सूडबुद्धीने केलेला गुन्हा मागे घेण्याची परभणीतून पत्रकारांची मागणी

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी** : छत्रपती संभाजीनगर येथे दैनिक 'जगमित्र'चे संपादक बालासाहेब कडबाने यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला गुन्हा हा द्वेषभावनेतून लावलेला असून पत्रकार स्वातंत्र्यावर थेट आघात करणारा आहे. त्यामुळे हा गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा, अशी मागणी परभणी जिल्ह्यातील पत्रकारांनी अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्यामार्फत छत्रपती संभाजी नगर पोलीस महानिरीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



या निवेदनात म्हटले आहे की, 'जगमित्र'चे संपादक बालासाहेब कडबाने यांनी राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या कार्यपद्धतीतील कथित गैरप्रकारांबाबत वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्तामुळे संबंधित प्रकरण जनतेसमोर आले. मात्र, याच पार्श्वभूमीवर द्वेषभावनेतून श्री. काझी यांच्या सहाय्यकांमार्फत कडबाने यांच्याविरोधात बेगमपुरा पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा क्रमांक ४२६/२०२६, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३५६, ३५३, ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकारांनी या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदविताना म्हटले आहे की, सत्य मांडणाऱ्या पत्रकारांवर अशा प्रकारे दबाव आणणे ही अत्यंत गंभीर बाब असून लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारी आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेसमोर सत्य मांडणे हा पत्रकारांचा अधिकार आणि कर्तव्य आहे. मात्र, अशा प्रकारच्या कारवायांमुळे पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून श्री. बालासाहेब कडबाने यांच्यावरील खोटा गुन्हा तात्काळ मागे घ्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. यावेळी मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, परभणी जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके, कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर, प्रदेश प्रतिनिधी राजकुमार हटेकर, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर शिंदे, विठ्ठलराव वडकुते, धाराजी भुसारे, डॉ. धनाजी चव्हाण, कोषाध्यक्ष मोईन खान, प्रसिद्धीप्रमुख सुधाकर श्रीखंडे, शहराध्यक्ष शिवशंकर सोनूणे, समन्वयक संजय बगाटे, भूषण मोरे, अरुण रणखांबे, अशोक पवार, संघपाल अढागळे सुनिल सुतारे आदींसह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्मार्ट सिटीचे स्वप्न की पाण्याचे संकट? उरणच्या पूरस्थितीवर अलंकार कडू सवाल!

## उरणचा विनाशकारी पाऊस: 35 वर्षांची जुनी 'पाणी वाट' आणि प्रशासकीय ढिसाळपणाचा बळी !

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड** : रात्रीच्या वेळी डोळ्यासमोर आपल्या हक्काचे घर, संसार आणि आयुष्यभराची पुंजी पाण्याखाली जात असताना, एका बापाची होणारी घालमेल तुम्ही कधी अनुभवली आहे का ? पावसाच्या पाण्याचा आवाज आता शांततेचा संदेश देत नाही, तर तो उद्याच्या विनाशाची चाहूल देतोय. कालपर्यंत ज्या मातीत आपली मुले खेळली, तिथे आज साचलेल्या घाण पाण्यामुळे आजारांचे सावट आहे. उरणमध्ये अवघ्या काही तासांच्या पावसाने शेकडो घरांमध्ये पाणी शिरले आणि सामान्य नागरिकांचे अतोनात नुकसान झाले. हे फक्त साचलेले पाणी नाही, तर ही प्रशासनाच्या अनास्थेची आणि मानवनिर्मित चुकांची 'तीव्र प्रतिक्रिया' आहे.असे परखड आक्रमक व स्पष्ट मत सामाजिक कार्यकर्ते तथा पर्यावरण प्रेमी अलंकार कडू यांनी व्यक्त केले आहे.



३५ वर्षापूर्वीचे नियोजन आणि आजची भीषण वास्तवता यात खूपच फरक आहे.गेल्या चार दशकांपूर्वी उरणची भौगोलिक स्थिती आणि लोकवस्ती लक्षात घेऊन पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी नैसर्गिक ओढे आणि नाले निश्चित करण्यात आले होते. पाऊस पडला की तो ओक्र्यातून खाडीत आणि खाडीतून समुद्रात जाणे हे निसर्गाचे चक्र होते. मात्र, आज ३५-४० वर्षांनंतरही आपण त्याच जुन्या नियोजनावर अवलंबून आहोत.

शहराचा विस्तार झाला, पण पाण्याचा मार्ग मात्र अरुंद झाला. उरणमध्ये मोठ्या औद्योगिक प्रकल्पांची निर्मिती करताना त्यांच्या अंतर्गत रस्त्यांनी, भिंतींनी आणि बांधकामांनी पावसाच्या पाण्याचे हे नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे बाचित वेन्ले आहेत. पाणी वाहून जाण्याच्या वाटा आपण मोकळ्या ठेवल्याच नाहीत, मग पूर येणार नाही तर काय होईल ? असा सवाल अलंकार कडू यांनी उपस्थित केला आहे.

विकासाचा हव्यास की विनाशाचा मार्ग यावर बोलताना अलंकार ठाकूर यांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे. उरणमध्ये अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या, ज्यांनी उरणच्या अर्थव्यवस्थेला गती दिली असेल, पण त्या बदल्यात येथील स्थानिक ग्रामस्थांना काय मिळाले ? दरवर्षी पावसाळ्यात आपल्याच घरात गुडघाभर पाणी साचलेले पाहणे, हेच नशिबी आले आहे का ? आपण प्रगतीच्या नावाखाली 'स्मार्ट सिटी आणि 'औद्योगिक हब'ची स्वप्ने पाहतोय, पण ज्या शहरात पावसाचे पाणी सुरक्षितपणे समुद्रापर्यंत पोहोचू शकत नाही, तिथे आपण 'प्रगती' केली आहे की 'विनाश' ओढवून घेतलाय ? जर निसर्गाचा कोप वाढला आणि जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले, तर मग आपल्या या सिमेंटच्या इमारती आणि कंपन्यांचा नफा आपल्याला वाचवाचला येतील का ? आता तरी जागे व्हा!

पाण्याचे नैसर्गिक मार्ग अडवून किंवा बुजवून केलेले हे बांधकाम आजच्या पूरस्थितीला जबाबदार आहे. जर आपण आताच आपल्या लोकप्रतिनिधींना आणि प्रशासनाला जाब विचारला नाही, तर येणारी पिढी आपल्याला कधीच माफ करणार नाही, प्रशासनाने आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.नैसर्गिक प्रवाहांचे सर्वेक्षण केले पाहिजे.

उरणमधील सर्व बंद झालेले ओढे आणि नाले तातडीने मौकळे करणे.कंपन्यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. ज्या प्रकल्पांमुळे पाण्याचे मार्ग बंद झाले आहेत, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून पर्यायी जलवाहिन्यांची युद्धपातळीवर निर्मिती करणे.भविष्यातील नियोजन केले पाहिजे केवळ काँक्रीटवर भर न देता, पावसाच्या पाण्याचा निचरा होईल अशी आधुनिक ड्रेनेज सिस्टिम विकसित करणे आदी उपाय या समस्यावर करता येतील.

### शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या वतीने झाडे लावा झाडे जगवा उपक्रम

# स्वत: पदाधिकाऱ्यांनी झाडे लावून तसेच नागरिकांना झाडे वाटप करून केली जनजागृती

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड** : शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या माध्यमातून नेहमी समाजात विविध विषयावर जनजागृती केली जाते. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, विनाश लक्षात घेता, सजीव सृष्टीचे धोक्यात असलेले अस्तित्व लक्षात घेता पर्यावरणाचे, निसर्गाचे संरक्षण संवर्धन होण्याच्या दृष्टी कोणातून शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या पदाधिकारी सदस्यांनी विविध उपक्रम राबविण्यास सुरवात केली आहे.




शिव प्रतिष्ठान करंजाडे यांच्या वतीने ' एक झाड करंजाडे च्या मातीसाठी एक झाड ऑक्सिजन युक्त करंजाडे साठी ' ही संकल्पना मोठया उत्साहात पार पडली. ह्या वेळेस करंजाडे येथे वड, पिंपळ, लिंब ह्या सारखी अनेक ऑक्सिजन युक्त झाडे लावून तसेच मोफत लोकांना झाडे वाटप कार्यक्रम पार पडला.ह्या वेळेस करंजाडे मधील लोकांना शिव प्रतिष्ठान करंजाडेच्या वतीने आवाहन करण्यात आले कि कोणावर अवलंबून न राहता आपली कामे आपणच केली पाहिजे तरच आपला गाव शहर हा संघटित होऊ शकतो. प्रत्येकाने झाडे लावा, वृक्ष लावा जेणेकरून पर्यावरणाचे, निसर्गाचे संवर्धन, संरक्षण होईल.ह्या कार्यक्रमास शिव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सत्यजित पाटील, सचिव राकेश कुसळे, सुरेश बार्वे,अमर कुसळे, अमर सावंत, नवनाथ सहाणे,सतीश चालगे, तुषार कदम,योगेश कुलाल, अंबाराया पुजारी, समीर कांबळे आदी पदाधिकारी, मान्यवर उपस्थित होते.

## जवाहर विद्यालयात गुणवंतांचा गौरव



**जिंतूर :** येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, संस्थेचे सचिव व प्रशासकीय अधिकारी खंडेराव वटाणे यांच्या अभिष्टचिंतनाचा कार्यक्रम आणि सेवानिवृत्त शिक्षक प्रदीप चव्हाण यांच्या गौरव सोहळ्याचा त्रिवेणी कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खंडेराव वटाणे होते. केंद्रप्रमुख सुशिल वाघमोडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. संस्थापक कै. दादासाहेब वटाणे पाटील यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. यावेळी दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. मोरया फाउंडेशनच्या वतीने प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ₹३१००, ₹२१०० व ₹११०० चे धनादेश प्रदान करण्यात आले.

प्राचार्य बळीराम वटाणे, केंद्रप्रमुख सुशिल वाघमोडे आणि अध्यक्ष खंडेराव वटाणे यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त व आत्मविश्वासाच्या बळावर यश संपादन करण्याचे आवाहन केले.

# महापालिकेची गट-क भरती परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच; पावसामुळे पुढे ढकलणार नसल्याचे प्रशासनाचे स्पष्टीकरण

### उमेदवारांना केंद्रावर पोहोचण्यासाठी 30 मिनिटांची अतिरिक्त मुदत

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील विविध पदांच्या २२२ रिक्त जागांसाठी ८ व ९ जुलै रोजी होणारी ऑनलाइन लेखी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच पार पडणार असून ती पुढे ढकलण्यात येणार नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाने मंगळवारी स्पष्ट केले. राज्यातील काही भागांत सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी होत असतानाच प्रशासनाने सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन हा निर्णय जाहीर केला आहे.

महानगरपालिकेच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, ८ जुलै रोजी तीन सत्रांमध्ये, तर ९ जुलै रोजी दोन सत्रांमध्ये परीक्षा होणार आहे. या परीक्षा राज्यातील १८ शहरांमधील ३१ परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आल्या आहेत.

पावसामुळे परीक्षा पुढे ढकलावी, अशी मागणी अनेक उमेदवारांनी ई-मेल, भ्रमणध्वनी आणि संदेशांच्या माध्यमातून केली होती. तर काही



उमेदवारांनी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच घ्यावी, अशी भूमिका प्रशासनाकडे मांडली. दरम्यान, प्रसारमाध्यमांमध्ये परीक्षा पुढे ढकलली जाणार असल्याच्या चर्चेमुळे उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने मुंबई, पुणे आणि नाशिक येथील आपत्ती व्यवस्थापन कक्ष, स्थानिक प्रशासन तसेच IBPS संस्थेशी संपर्क साधून तेथील हवामान, वाहतूक व्यवस्था आणि परीक्षा केंद्रांवरील परिस्थितीचा आढावा घेतला. संबंधित यंत्रणांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याचे कळविले असून हवामान विभागाच्या अंदाजानुसार ८ व ९ जुलै रोजी पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

IBPS संस्थेच्या माहितीनुसार, उमेदवारांना त्यांनी निवडलेल्या पहिल्या पसंतीच्या शहरातच परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच महानगरपालिकेने सर्व ३१ परीक्षा केंद्रांवर अधिकाऱ्यांची नियुक्ती करून प्रत्यक्ष पाहणी केली असून परीक्षेची सर्व तयारी पूर्ण झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या नियोजित वेळेत ३० मिनिटांची अतिरिक्त सवलत देण्यात आली आहे. सर्व उमेदवारांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रवेशपत्रावरील सूचनांचे पालन करून नियोजित दिवशी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

## एमआयटी महाविद्यालयात संस्कृत गीत स्पर्धेने कालिदास दिन साजरा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एमआयटी महाविद्यालयात महाकवी कालिदास यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कालिदास दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संस्कृत गीत गायन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




स्पर्धेत कामाक्षी देशमुख, प्रणिता महस्के, गुणगुणा राठोड, कैवल्या सोळुंखे, श्रद्धा सोळुंखे, अक्षरा जाधव आणि श्रेयस डहाळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यापैकी कामाक्षी देशमुख आणि प्रणिता महस्के यांनी 'सुंदर सुरभाषा' या विषयावरील संस्कृत गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

कार्यक्रमादरम्यान शिवकुमार मगर यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. स्पर्धेतील विजेत्यांना सोधी मॅडम आणि राव मॅडम यांच्या हस्ते बक्षिसे व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रम सुवर्णा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

# घाटीत लाडपागे व अनुकंपा अंतर्गत 10 पात्र उमेदवारांना नियुक्ती

### अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण, प्रामाणिकपणे कार्य करण्याचे नवनियुक्तांना आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** घाटी रुग्णालयात नुकत्याच पार पडलेल्या साडेतीनशे कर्मचाऱ्यांच्या मेगा भरतीनंतर आता लाडपागे समिती व अनुकंपा तत्त्वावरील पात्र उमेदवारांनाही दिलासा मिळाला आहे. या अंतर्गत चतुर्थश्रेणी पदांसाठी निवड झालेल्या एकूण १० उमेदवारांना मंगळवारी (७ जुलै) अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते नियुक्तिपत्रांचे वितरण करण्यात आले.



यावेळी बोलताना डॉ. सुक्रे यांनी नवनियुक्त कर्मचाऱ्यांनी रुग्णसेवा ही सर्वोच्च जबाबदारी मानून प्रामाणिकपणे व संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहन केले. तसेच घाटी रुग्णालयाची सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वांनी समर्पित भावनेने कार्य करण्याचेही त्यांनी सांगितले.

नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने केलेल्या सहकार्याबद्दल उमेदवारांनी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे तसेच रुग्णालय प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

यावेळी उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, उपअधिष्ठाता डॉ. काशिनाथ गर्कळ, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी, प्रशासकीय अधिकारी गाड, दिलीप गोधणे, डॉ. वैशाली उणे-लोखंडे, डॉ. सोनाली जटाळे आदी उपस्थित होते.

**लाडपागे समिती अंतर्गत नियुक्त उमेदवार :**

सफाईगार पदासाठी विशाल मारोती कांबळे, रोहण पदमाकर सुरडकर आणि मोहम्मद सुमेर कलीम शेख यांना नियुक्ती देण्यात आली.

**अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त उमेदवार :**

सफाईगार पदासाठी प्रदीप प्रकाश रॉय, शेख नवीद शेख जावेद, स्वाती अमोल सरपाते, भावेश जितेंद्र चव्हाण आणि दुर्गा महेंद्र चंडालीया यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच कक्षसेवक पदावर अम्रपाली रावसाहेब ताटे आणि आरती प्रशांत येरफुले यांना नियुक्तिपत्र देण्यात आले.

# MPSC: शहरात 12 जुलै रोजी 'गट-क मुख्य परीक्षा'; 4,824 उमेदवार नशीब आजमावणार

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आगामी रविवारी, म्हणजेच १२ जुलै २०२६ रोजी 'महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील १५ शाळा आणि महाविद्यालयांच्या केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार असून, यासाठी जिल्ह्यातील एकूण ४,८२४ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला आहे. परीक्षेचे कामकाज अत्यंत सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनातर्फे ५१९ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सदर परीक्षा दोन वेगवेगळ्या सत्रांमध्ये घेतली जाणार आहे. यातील सकाळचे पहिले सत्र सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या वेळेत होईल, तर दुपारचे दुसरे सत्र दुपारी ०३.०० ते दुपारी ०४.०० या वेळेत पार पडेल. परीक्षेला येताना उमेदवारांनी आपल्या अधिकृत प्रवेशपत्रासोबत आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यांपैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक करण्यात आले आहे. मूळ ओळखपत्राशिवाय उमेदवारांना परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. आयोगाच्या सुधारित कार्यपद्धतीनुसार नियमांची कडक अंमलबजावणी केली जाणार आहे. परीक्षा सुरू होण्याच्या ठीक अर्धा तास आधी परीक्षा केंद्राचे मुख्य प्रवेशद्वार बंद केले जाईल. त्यामुळे उशिरा पोहोचणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत आत सोडले जाणार नाही. ही गैरसोय टाळण्यासाठी सर्व उमेदवारांनी सकाळी १०.०० ते १०.३० वाजण्याच्या आधीच परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच, परीक्षा कक्षामध्ये मोबाईल, ब्लूटूथ, स्मार्टवॉच किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांना सक्त मनाई असेल. परीक्षा केंद्रावर असे कोणतेही संशयास्पद साहित्य आढळल्यास संबंधित उमेदवारावर तात्काळ फौजदारी आणि प्रशासकीय कारवाई केली जाईल. यासोबतच अशा उमेदवारांना आयोगाच्या आगामी सर्व परीक्षांसाठी कायमचे प्रतिबंधित करण्यात येईल, असा कडक इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## स्वाधार योजनेच्या लाभासाठी शासकीय वसतिगृहाचा अर्ज भरणे अनिवार्य

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** समाज कल्याण कार्यालयांतर्गत मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह परभणी, मानवत, सेलू, पूर्णा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह परभणी,सेलू,पूर्णा,मानवत,गंगाखेड या शासकीय वसतिगृहामध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देण्यात येत आहेत. गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait-new.org/ या संकेत स्थळावर ऑनलाइन अर्ज करावे. दि. १० जून २०२६ पासून ऑनलाइन अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ सुरू झाले आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर प्रवर्गातील इयत्ता आठवी, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहामधील रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार विनामूल्य प्रवेश ऑनलाइन पद्धतीने देण्यात येणार आहे.

जर गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी विद्यार्थ्याला शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, तरच त्याला स्वाधार योजनेसाठी अर्ज सादर करता येईल. जे विद्यार्थी वसतिगृह योजनेचा अर्ज भरणार नाहीत, त्यांना स्वाधार व वसतिगृह या दोन्ही योजनांचा लाभ मिळणार नाही. ज्या तालुक्यामध्ये शासकीय वसतिगृहे नाहीत, अशा तालुक्यात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सदर नियम शिथिल करण्यात आला आहे.

## मुंबई येथे मंत्री संजय शिरसाठ यांची शेख सलीम यांनी घेतली सदिच्छा भेट

**अजिंठा प्रतिनिधी :** मुंबई येथे राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय शिरसाठ यांची सिल्लोड तालुक्यातील पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी मतदारसंघातील विविध विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सुविधा तसेच प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेख सलीम यांनी मंत्री संजय शिरसाठ यांच्यासमोर मतदारसंघातील रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शिक्षण, आरोग्य, जलनिस्सारण, वीजपुरवठा तसेच इतर विकासकामांबाबत सविस्तर माहिती देत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.



यावर मंत्री संजय शिरसाठ यांनी विकासकामांना प्राधान्य देत आवश्यक त्या प्रस्तावांना सकारात्मक प्रतिसाद देऊन शासनस्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.


यावेळी शेख सलीम यांनी मंत्री संजय शिरसाठ यांचे आभार मानत, मतदारसंघाच्या विकासासाठी शासनाचे सहकार्य लाभेल, असा विश्वास व्यक्त केला. या भेटीप्रसंगी त्यांच्यासोबत सहकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गांजाची बेकायदेशीर लागवड उघड; पाच किलोहून अधिक गांजा जप्त

### शिल्लेगाव पोलिसांची लासूर स्टेशन परिसरात मोठी कारवाई; शेतातून गांजाची झाडे जप्त करत एका आरोपीला घेतले ताब्यात

**लासूर स्टेशन :** लासूर स्टेशन ते देवगाव रोड परिसरात पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शिल्लेगाव पोलिसांनी एका शेतात छापा टाकून बेकायदेशीररित्या केलेली गांजाची लागवड उघडकीस आणली आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी पाच किलो आठशे एक ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून, या प्रकरणी एका संशयित आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईमुळे परिसरात बेकायदेशीर अंमली पदार्थांची शेती करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

पोलीस उपनिरीक्षक काळे हे आपल्या पोलीस अंमलदारांच्या पथकासह लासूर स्टेशन ते





देवगाव रोड परिसरात नियमित पेट्रोलिंग करत होते. याच दरम्यान त्यांना माळी वडगाव शिवारातील एका शेतात गांजाची बेकायदेशीर लागवड करण्यात आल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना अवगत करण्यात आले. त्यानंतर दोन शासकीय पंच आणि कृषी अधिकारी यांना पाचारण करून त्यांच्या उपस्थितीत संबंधित शेतात छापा टाकण्यात आला.

या छाप्यात शेतामध्ये गांजाची तीन मोठी झाडे लावलेली आढळून आली. पोलीस पथक पोहोचले तेव्हा शेतातील एका झाडाचा पाला तोडत असतानाच संशयित आरोपी ज्ञानेश्वर शंकर कळवणे याला पोलिसांनी रंगेहात पकडले आणि तात्काळ ताब्यात घेतले. यानंतर शासकीय पंचांसमक्ष सर्व झाडे मुळासकट उपटून जप्त करण्यात आली आणि जप्तीचा पंचनामा करण्यात आला. जप्त केलेल्या या गांजाचे एकूण वजन पाच किलो आठशे एक ग्रॅम भरले असून, बाजारात त्याची अंदाजे किंमत सत्त्याऐंशी हजार पंधरा रुपये इतकी आहे.


वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि अंमलदारांच्या संयुक्त पथकाने ही यशस्वी कारवाई पार पाडली. या प्रकरणी जप्त केलेल्या अंमली पदार्थांसह आरोपीविरुद्ध शिल्लेगाव पोलीस ठाण्यात कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला असून, या बेकायदेशीर लागवडीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# 40 वर्षे पुनर्वसन रखडवून शेवा गावठाणावर कोट्यवधींचे उद्यान ?; जेएनपीए व प्रशासनाविरोधात SIT चौकशीची विस्थापितांची संतप्त मागणी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील शेवा व कोळीवाडा येथील ६२० विस्थापित कुटुंबांनी जेएनपीए आणि संबंधित महसूल अधिकाऱ्यांविरोधात गंभीर आरोप करत संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथक (SIT) मार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. पुनर्वसन न करता मूळ गावठाणावर कोट्यवधी रुपयांची उद्याने व विकासकामे सुरू करून विस्थापितांच्या हक्कांवर गदा आणल्याचा आरोप करण्यात आला आहे.









विस्थापितांच्या म्हणण्यानुसार, शेवा बेटावर सुमारे ८०० हेक्टर सुपीक शेती आणि सुमारे २३,५४२ हेक्टर पारंपरिक मासेमारी क्षेत्र होते. या परिसरावर शेकडो कुटुंबांची शेती, मासेमारी, फळबागा, पशुपालन आणि इतर पारंपरिक व्यवसायांवर आधारित उपजीविका होती.

२१ जून १९८४ रोजी शासनाने शेवा व कोळीवाडा गावठाणातील ७.२१ हेक्टर क्षेत्र संपादनासाठी अधिसूचना काढली होती. मात्र, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), उरण कार्यालयाने २४ जून २०२६ रोजी माहिती अधिकारांतर्गत दिलेल्या उत्तरात ही जमीन आजपर्यंत संपादित झालेली नसल्याची लेखी माहिती दिल्याचा दावा विस्थापितांनी केला आहे.

याउलट, १७ फेब्रुवारी १९९० आणि १७ मार्च १९९० रोजी काढण्यात आलेल्या दोन आज्ञापत्रांमध्ये शेवा व कोळीवाडा गावठाण विनामूल्य संपादित करून त्याबदल्यात बोरीपाखाडी व बोकडविरा येथे पर्यायी जमीन दिल्याचा उल्लेख आहे. ही दोन्ही आज्ञापत्रे बनावट असल्याचा गंभीर आरोप विस्थापितांनी केला असून, त्याच आधारे गेली ४० वर्षे ६२० प्रकल्पग्रस्त कुटुंबांची दिशाभूल, फसवणूक आणि पुनर्वसनापासून वंचित ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

विस्थापितांनी असा आरोप केला आहे की, संबंधित बनावट आज्ञापत्रांचा आधार घेत जेएनपीए आणि पुनर्वसन प्रशासनाने पुनर्वसनाचा प्रश्न जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवला. त्यामुळे शेकडो कुटुंबांचे घटनात्मक आणि कायदेशीर हक्क बाधित झाले.

दरम्यान, ८ डिसेंबर २०२५ रोजी शासनाला सादर करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालात बोरीपाखाडी येथील उपलब्ध करून दिलेली जमीन अपुरी असल्याची नोंद असून, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक समस्यांमध्ये वाढ झाल्याचे नमूद असल्याचा दावा करण्यात आला आहे.

विस्थापितांच्या आरोपानुसार, पुनर्वसनाचा प्रश्न निकाली न काढता जेएनपीए प्रशासनाने शेवा मूळ गावठाण परिसरात मंदिरांचा जीर्णोद्धार, उद्यान व सुशोभीकरणासाठी सुमारे ₹१३.१४ कोटींच्या कामांना मंजुरी दिली आहे. संबंधित ठेकेदारांकडून प्रत्यक्ष कामेही सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

विस्थापितांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची तसेच संपूर्ण प्रकरणाची एस आय टी (SIT) मार्फत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर फौजदारी व विभागीय कारवाई करण्याची मागणी शासनाकडे केली आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911